बुधवार, दि २५ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २८ वा ● किमंत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### जालना शहर महानगर पालिका

## महिला सदस्य; 'पतीराज' संस्कृतीचा प्रभाव वाढतोय

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या राजकारणात सध्या जनहिताचे प्रश्न मागे पडत असून 'केबिन वाटप' हा नवा वाद पेटला आहे. नवनियुक्त सभापती-उपसभापतींना कार्यालयीन जागा अपुरी पडत असल्याने लोकप्रतिनिधींमध्ये संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सगळ्या गोंधळात अतिरिक्त आयुक्त गिराम यांच्यावर प्रशासकीय तोल सांभाळण्याची मोठी जबाबदारी आली आहे. परंतु या वादातून एक अधिक गंभीर मुद्दा समोर आला आहे. महिला आरक्षणाच्या जागांवर 'पतीराज' संस्कृतीचा प्रभाव वाढत चालला आहे.

**'पतीराज' संस्कृती काय आणि समस्या कुठे?**

महिला आरक्षणाचा उद्देश महिलांना राजकीय निर्णयप्रक्रियेत थेट सहभाग देणे हा आहे. मात्र प्रत्यक्षात काही ठिकाणी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या ऐवजी त्यांचे पती/नातेवाईक कार्यालयीन कामकाज पाहताना दिसतात. अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, केबिन/सुविधांसाठी वाद घालणे. फाईल्स, बैठका आणि निर्णय प्रक्रियेत अनधिकृत हस्तक्षेप करणे, ही प्रवृत्ती वाढल्यास महिला सक्षमीकरणाचा मूळ हेतूच धोक्यात येतो आणि लोकशाही प्रक्रियेची पारदर्शकताही कमी होते.

**कायदा काय सांगतो?**

भारताच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (महानगरपालिका/नगरपालिका) निवडून आलेल्या प्रतिनिधीशिवाय इतर कोणालाही अधिकृत निर्णयप्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

लागू होणारे प्रमुख नियमांमध्ये महानगरपालिका अधिनियम (राज्यनिहाय कायदे) सेवा नियम, अधिकाऱ्यांना अनधिकृत दबाव टाळण्याची जबाबदारी, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा हा प्रभाव टाकून निर्णय बदलल्यास लागू होऊ शकतो.

निवडून आलेल्या महिला सदस्यांच्या जागी त्यांच्या पतींनी निर्णय घेणे किंवा आदेश देणे कायद्याने वैध नाही.

कारवाई कोण करू शकते?

या प्रकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध स्तरांवर कारवाईची तरतूद आहे त्यात प्रामुख्याने महानगरपालिका प्रशासन आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्तांकडे तक्रार दिल्यास संबंधित व्यक्तींना कार्यालयात प्रवेशावर निर्बंध घातल्या जावू शकतात. अधिकाऱ्यांना लेखी सूचना देऊन अनधिकृत व्यक्तींचे आदेश न मानण्याचे निर्देश ते देऊ शकतात.

तर जिल्हाधिकारी / राज्य शासन गंभीर प्रकरणात चौकशी समिती नियुक्त लोकप्रतिनिधींना नोटीस किंवा स्पष्टीकरण मागवणे तसेच नियमभंग झाल्यास पदावर कारवाईची शिफारस करता येईल. महत्त्वाचे म्हणजे न्यायालयीन हस्तक्षेप यात सामाजिक कार्यकर्ते किंवा नागरिक हायकोर्टात जनहित याचिका दाखल करू शकतात. त्यानंतर न्यायालयाकडून थेट निर्देश जारी होऊ शकतात.

त्याचबरोबर निवडणूक आयोग / स्थानिक स्वराज्य विभागाला आचारसंहितेचे उल्लंघन किंवा अधिकारांचा गैरवापर सिद्ध झाल्यास पुढील निवडणुकीवर परिणाम होण्याची शक्यता असते.




**आधीच्या तक्रारींचे काय?**

महिला सदस्यांच्या कामकाजात पती किंवा नातेवाईक हस्तक्षेप करत असल्याच्या तक्रारी यापूर्वीही सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आल्या आहेत. त्या तक्रारींवर नेमकी काय कारवाई झाली? चौकशीचा अहवाल सार्वजनिक का झाला नाही? की चौकशीच झाली नाही.

पारदर्शकतेचा अभाव असल्याने अशा प्रकरणांना आळा बसत नाही, उलट त्यांना अप्रत्यक्ष प्रोत्साहन मिळते.

राजकीय व सामाजिक तज्ज्ञांच्या मते महिला प्रतिनिधींना स्वतंत्र प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देणे गरजेचे आहे. प्रशासनाने 'नो प्रॉक्सी' धोरण कडकपणे लागू करावे, कार्यालयीन परिसरात ओळखपत्र आणि प्रवेश नियंत्रण सक्तीचे करावे.

आता सर्वांचे लक्ष प्रशासन आणि शासनाच्या पुढील पावलांकडे लागले आहे. कारण निवडून आलेला प्रतिनिधी कोण आहे, हे केवळ कागदावर नाही तर प्रत्यक्ष कामकाजातही दिसायला हवे.

## अर्थसंकल्पाची दिशा; 'कमाई वाढवा सेवा सुधारवा'

### महानगरपालिकेचा ४६३ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या नवनियुक्त लोकप्रतिनिधींच्या पहिल्या स्थायी समितीसमोर आज आगामी वर्षाचा ४६३ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. मुख्य लेखाधिकारी तथा उपायुक्त नंदा गायकवाड यांनी हा अर्थसंकल्प मांडला. स्थायी समिती सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत उत्पन्न वाढीसाठी कडक उपाययोजना आणि शहराच्या सौंदर्यीकरणावर लोकप्रतिनिधींनी विविध सूचना मांडल्या. यावेळी आयुक्त आशिमा मित्तल, यांसह सर्व स्थायी समिती सदस्य भास्कर दानवे, अक्षय गोरंटयाल, महेश निकम, महावीर ढक्का, शशिकांत घुगे, अशोक पवार, कपिल भुरेवाल, भाग्यश्री जोगस, पदमा मानधानी, निखिल पगारे, अब्दुल सगीर अजिज शेख, पूजा भगत, फारुख सादीक तुंडीवाले, अमजदखान नवाब खान, खान नगमाबी फेरोज खान, आणि अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सर्व सहाय्यक आयुक्त व विभाग प्रमुख उपस्थित होते. या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू स्पष्ट दिसतो महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवणे आणि त्याचवेळी नागरिकांना दर्जेदार सेवा देणे. यासाठी कर वाढवण्याऐवजी कर वसुली सुधारण्यावर भर देण्यात आला आहे.

**'पुणे पॅटर्न'ची अंमलबजावणी**

सदस्यांनी 'पुणे महानगरपालिका'च्या धर्तीवर कडक कर वसुली यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव मांडला.

थकीत कर वसुलीसाठी पूर्वलक्षी प्रभावाने कारवाई, मालमत्तांचे फेर-सर्वेक्षण करून नव्याने कर आकारणी, व्यावसायिक जागांचे भाडे पुनर्निर्धारण हा निर्णय आर्थिकदृष्ट्या गेम-चेंजर ठरू शकतो. मात्र, नागरिकांवर अचानक आर्थिक ताण येऊ नये यासाठी टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी गरजेची ठरेल.

**अतिक्रमणमुक्त व हायटेक शहराची दिशा**

शहराचे विद्रूपीकरण थांबवण्यासाठी कठोर उपाय सुचवण्यात आले आहेत., अनधिकृत होर्डिंग्सवर कारवाई, मंगल कार्यालयांच्या पार्किंगवर शुल्क, व प्रणालीद्वारे स्वच्छता व्यवस्थेचे मॉनिटरिंग, ड्रोनद्वारे फॉगिंग डास नियंत्रणासाठी आधुनिक उपाय, ड्रोन फॉगिंग आणि ट्रॅकिंगसारखे उपाय जालना शहराला 'स्मार्ट सिटी'कडे नेणारे ठरू शकतात. मात्र, या यंत्रणांची पारदर्शकता आणि देखभाल महत्त्वाची ठरेल.

**शिक्षण क्षेत्रात मोठा बदल**

मनपा शाळा १००% 'सेमी इंग्लिश' करण्याचा मानस, नवीन शाळा इमारतींचा प्रस्ताव, शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी निधीत वाढ ग्रामीण व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय निर्णायक ठरू शकतो. इंग्रजी माध्यमाचा वाढता प्रभाव लक्षात घेता, हा बदल भविष्यातील स्पर्धात्मकतेसाठी फायदेशीर ठरेल.

**पर्यावरणपूरक जालना**

प्लास्टिक कॅरीबॅगवर दंडात्मक कारवाई, महानगरपालिकेच्या ताफ्यात इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश, सोलार प्रकल्प राबवून वीज खर्चात कपात, पर्यावरण आणि अर्थकारण यांचा समतोल साधण्याचा हा प्रयत्न आहे. दीर्घकालीन बचत आणि प्रदूषण नियंत्रणासाठी हे निर्णय महत्त्वाचे आहेत.

**पर्यटनातून उत्पन्न वाढीचा प्रयत्न**

सभापती पांगारकर यांनी शहरातील पर्यटन स्थळांच्या विकासावर भर दिला., छत्रपती संभाजी उद्यान (मोती तलाव) येथे 'पिकनिक स्पॉट', मुक्तेश्वर व मोती तलाव येथे तत्त्वावर बोटींग, नागरिकांसाठी आकर्षक सुविधा निर्माण, जालना शहरात पर्यटन हा अजूनही कमी वापरलेला आर्थिक स्रोत आहे. योग्य नियोजन केल्यास महापालिकेला कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन निर्माण होऊ शकते.

**नागरी समस्या सोडवण्यावर भर**

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, नवीन कचरा संकलन केंद्र उभारणी, वेळ आणि इंधन बचतीसाठी कार्यक्षम कचरा व्यवस्थापन, या समस्या थेट नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित आहेत. त्यामुळे त्यावर त्वरित आणि प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित आहे.

**आव्हाने आणि वास्तव**

जरी अर्थसंकल्पात अनेक सकारात्मक बाबी असल्या तरी काही आव्हाने स्पष्ट आहेत, कडक कर वसुलीमुळे नागरिकांचा विरोध होण्याची शक्यता, तांत्रिक प्रकल्पांसाठी आवश्यक कौशल्य व देखभाल, प्रस्तावांची अंमलबजावणी वेळेत होणे, ४६३ कोटींचा हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून जालन्याला आधुनिक, स्वच्छ आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम शहर बनवण्याचा रोडमॅप आहे. उत्पन्न वाढ, तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षण सुधारणा आणि पर्यटन विकास या चार स्तंभांवर हा अर्थसंकल्प उभा आहे. आता सर्वांचे लक्ष असेल ते महासभेत होणाऱ्या मंजुरीकडे आणि त्यानंतरच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे. कारण, योजनांची खरी परीक्षा कागदावर नाही, तर जमिनीवर होते.



## संपादकीय

# भोंदूबाबा ; पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली कीड

कॅप्टन म्हणवून घेणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात या वासनांधांचे विविध लीलांचे तपशील बाहेर येत असल्याने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या प्रकरणाशी संबंधित ५८ व्हिडिओ बाहेर पडल्याने आणि जवळपास १०० हून अधिक व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागल्याने या प्रकरणातील संवेदनशीलता आणि व्याप्ती खूप वाढलेली बघायला मिळत आहे. सामाजिक, राजकीय, प्रशासकीय अशा उच्चभ्रू क्षेत्रातील लोक या भोंदूबाबाचे भक्त असून या भोंदूबाबामुळे त्याच्या भोंदू भक्तांचेही धाबे दणाणले आहेत. या भोंदूबाबच्या चौकशीतून आखणी धक्कादायक गोष्टी समोर येतील ज्याने महाराष्ट्रात आणखी खळबळ माजेल अनेकांचे बुरखे फाटले जातील. या भोंदूबाबावर कठोरात कठोर कारवाई व्हायलाच हवी पण केवळ त्याच्यावरच नव्हे तर त्याच्या भक्तांवर देखील कारवाई व्हायला हवी कारण यांच्यामुळे पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय अवस्थेचे लत्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. या भोंदूबाबा आणि त्याच्या अंध भक्तांमुळे पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकली आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात अशाप्रकारे भोंदूबाबांचे पेव फुटणे ही एकप्रकारे पुरोगामी महाराष्ट्राची अधोगतीच आहे. भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने समाजातील विवेक, विज्ञाननिष्ठा आणि कायद्याचा वचक पार धुळीस मिसळलेला बघायला मिळत आहे. अर्थात याला आपले राजकीय नेतेही तितकेच जबाबदार आहेत. संविधानाची शपथ घेऊन आमदार, खासदार, मंत्री बनणारे आमचे नेते अशा भोंदूबाबांच्या कच्छपी लागत असेल तर या भोंदूबाबांवर कायद्याचा वचक कसा राहील? ज्या नेत्यांनी समाजासमोर आपल्या वर्तणुकीतून आदर्श निर्माण करायचा असतो तेच नेते तर जर अशा भोंदूबाबांचे पाय धुवत असतील तर भोंदूबाबांना कायद्याचा धाक कसा राहील ? जादूटोणाविरोधी कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कायद्यासाठी डॉ नरेंद्र दाभोळकर यांनी हौतात्म्य पत्करले. आजची परिस्थिती पाहिली तर डॉ नरेंद्र दाभोळकर यांचे हौतात्म्य वाया गेले की काय ? असा प्रश्न पडतो कारण ज्या कायद्यासाठी त्यांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले त्या कायद्याचे अस्तित्वच आज कोठे दिसत नाही. आज २१ व्या शतकातही लोक अंधश्रद्धेच्या किती आहारी गेले आहेत ते या प्रकरणाने दाखवून दिले आहे. अजूनही लोकांना श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक समजत नाही. अध्यात्माच्या नावाखाली लोक अशा भोंदूबाबांच्या नादी लागतात आणि स्वतःसह समाजाचेही नुकसान करून घेतात. लोकांच्या श्रद्धेचा ( अंध ) बाजार मांडून अशोक खरात सारखे भोंदू बाबा कॅप्टन फाईल बनवतात. अर्थात अशी फाईल असलेला अशोक खरात हा एकमेव भोंदूबाबा नाही. गावागावात, शहरशहरात असे अनेक भोंदूबाबा आहेत जे भक्तांच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन आपल्या तुंबड्या तर भरतच आहेत पण महिला भगिनींच्या अब्रूही लुटत आहेत. अशोक खरात प्रमाणेच श्रद्धेचा बाजार मांडून भक्तांना लुबाडणाऱ्या गावागावातील या भोंदूबाबांची देखील छाटणी करायला हवी. आज हा खरात आहे, उद्या दुसराच कोणी...उभा राहील ? तेंव्हा थोतांड प्रवृत्तीच्या या भोंदूबाबांचा बीमोड होणे आवश्यक आहे त्यासाठी जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवीच त्याशिवाय लोकांनीही आपला विवेक जागृत ठेवून अशा भोंदूबाबांच्या नादी लागणे सोडून द्यावे. भोंदूबाबा म्हणजे पुरोगामी महाराष्ट्राला लागलेली कीड आहे ही कीड मुळापासून उपटून टाकायलाच हवी.

# वृत्तपत्र उद्योगाला ऊर्जितावस्था द्या; परतूर तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना साकडे

**परतूर । प्रतिनिधी -** राज्यातील वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून तो सध्या प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. वाढती महागाई आणि शासनाचे जुने जाहिरात धोरण यामुळे लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले असून, वृत्तपत्र उद्योगाला ऊर्जितावस्था देऊन प्रलंबित मागण्या तत्काळ मान्य कराव्यात, या मागणीसाठी परतूर येथे तहसीलदारांमार्फत व्हॉइस ऑफ मिडिया चे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब पाटील मुके, उपाध्यक्ष अशोक ठोके, सचिव मुमताज अन्सारी, सल्लागार अजय देसाई, बालाजी ढोबळे, राज भदर्गे व सदस्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून कागद, छपाई साहित्य, वीज आणि मनुष्यबळ यांच्या खर्चात सुमारे १५ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. मात्र, सन २०१९ पासून शासनाने जाहिरात दरांमध्ये कोणतीही वाढ केलेली नाही. या अन्यायाविरुद्ध वॉईस ऑफ मीडियाच्या वतीने राज्यभर लाक्षणिक आंदोलने सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर आज परतूर तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनातील प्रमुख मागण्या - १५ टक्के दरवाढः सन २०१९ ते २०२६ या काळातील महागाई लक्षात घेता जाहिरात दरात तातडीने १५ टक्के वाढ करावी., ई-टेंडर जाहिरातीः ई-टेंडरच्या नोटिसेस संक्षिप्त न करता पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध कराव्यात., पेन्शन योजनेत सुधारणा - २० वर्षे सेवा करणाऱ्या व ५५ वर्षे वय असलेल्या पत्रकारांना शंकरराव चव्हाण पत्रकारिता पेन्शन निधीचा लाभ मिळावा आणि १० वर्षे सेवा करणाऱ्यांना अधिस्वीकृती पत्रिका द्यावी. देयके वेळेवर अदा करणे - जाहिरातींची बिले ३० दिवसांच्या आत मिळावीत, अन्यथा त्यावर बँकेच्या दराने व्याज द्यावे. समान संधीः - मोठ्या वृत्तपत्रांप्रमाणेच लघु व मध्यम वृत्तपत्रांना न्याय्य पद्धतीने जाहिरातींचे वाटप करावे. जाहिरात नियंत्रण - अनेक कार्यालये परस्पर जाहिराती देतात, ती पद्धत बंद करून सर्व जाहिराती माहिती खात्यामार्फतच द्याव्यात.

लोकशाहीचा पाया वाचवा - वृत्तपत्र हा केवळ व्यवसाय नसून तो लोकशाहीचा पाया आहे. जर हा स्तंभ आर्थिक अडचणींमुळे कमकुवत झाला, तर जनतेच्या माहितीच्या अधिकारावर गदा येईल. ज्या वृत्तपत्रांनी २५ वर्षे पूर्ण केली आहेत, त्यांना नैसर्गिक दरवाढ लागू करण्यात यावी आणि प्रलंबित तपासण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी वॉईस ऑफ मीडियाचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब पाटील मुके, उपाध्यक्ष अशोक ठोके, सचिव मुमताज अन्सारी, प्रवक्ते अर्जुन पाडेवार यांच्यासह सल्लागार शिवकुमार भारूका, माणिक



जैस्वाल, प्रा. शरद बोराडे, राज भदर्गे, शेख अन्वर, आशिष गारकर, आशिष धुमाळ, राजकुमार भारूका, एम. एल. कुरेशी, अजय देसाई, भारत सवने, केदार शर्मा, बालाजी ढोबळे, सर्फराज नाईकवाडी, तारीख शेख, कैलास सोळंके आदी पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. होती. या निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि मुख्य सचिवांनाही पाठवण्यात आल्या आहेत.




# नवउद्योजकांसाठी मार्गदर्शन मेळावा उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी आणि नवउद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना आणि 'दे आसरा' फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात नवउद्योजकांसाठी विशेष उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. दि. २४ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या मेळाव्यात जिल्ह्यातील सूक्ष्म व अतिसूक्ष्म उद्योजकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाराष्ट्र राज्यात सूक्ष्म उद्योग हे रोजगाराचे महत्त्वाचे साधन आहेत. मात्र, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि वित्तीय व्यवस्थापन अशा क्षेत्रांत उद्योजकांना अनेकदा अडचणी येतात. या मेळाव्याचा मुख्य उद्देश उद्योजकांना या विषयांवर मार्गदर्शन करणे आणि त्यांच्यातील नेटवर्किंग वाढवणे हा होता. सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

'दे आसरा' फाउंडेशनच्या वतीने राहुल लिमये यांनी 'मार्केटिंग तंत्र' या विषयावर, तर किरण धगे यांनी 'उद्योजकतेची वाटचाल' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच स्नेहा नन्नवरे यांनीही उपस्थित नवउद्योजकांशी संवाद साधून मोलाच्या टिप्स दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल परिहार यांनी केले तर आभार भुजंग रिठे यांनी मानले. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी कौशल्य विकास विभागाचे अमोल बोरकर, आत्माराम दळवी, प्रदीप डोळे, नितीन लोकडे, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, योगेश बहुरे, दीपक पालवे व गणेश सुपारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# महाराष्ट्र बदनाम होत आहे

महाराष्ट्र संत महात्म्यांचे पदस्पर्शाने पावन झालेली भूमी म्हटली जाते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत जनाबाई, संत नामदेव संत, गोरा कुंभार, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा,रामदास स्वामी, या अशा संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. तसेच ज्या ठिकाणी प्रभू रामचंद्राचे पदस्पर्श झाला अशी ही नाशिकची पवित्र भूमी आहे.

परंतु गेल्या दोन-चार दिवसापासून प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि समाज माध्यमावरून जे काही आपण वाचतो आहे आणि अनेक छायाचित्रे समोर येत आहे. ते बघितल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेलेला आहे. महाराष्ट्राची संस्कृती. धार्मिक परंपरा हरवून चाललीय का असे वाटते. अशा भोंदूगिरी मधून धार्मिक विधींची थट्टा होत आहे.धार्मिक विधीना वासना,लैंगिक संबंधाशी जोडून महिलावर लैंगिक अत्याचार केले जात आहे.

नाशिक मध्ये जी लैंगिक अत्याचाराची घटना उघड झाली तिने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे.

नाशिकमधला भोंदू ज्योतिषी अशोक खरात याच्याविरोधात एका महिलेनं अत्याचाराची तक्रार दाखल केली आणि त्यानंतर त्याचे एक- एक काळे कारनामे समोर येण्यास सुरुवात झाली आहे. या प्रकरणात आतापर्यंत शंभर चे जवळपास व्हिडीओ समोर आले आहेत. खरात याला नाशिक पोलिसांनी अटक केली असून, सध्या त्याची एस आय टी कडून चौकशी सुरू आहे. दरम्यान जेव्हा त्याला अटक करण्यात आली तेव्हा त्याने पोलिसांना धमकावल्याचा धक्कादायक प्रकार देखील समोर आला आहे. 'तुम्ही घोर अपमान करत आहात, तुमच्यावर कोप होईल' असं काहीतरी खरात यावेळी बडबडत होता, अशी माहिती समोर येत आहे.

अशोक खरात याच्याविरुद्ध लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नाशिकमध्ये सरकारवाडा पोलिसांत हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशोक खरात याने एका ३५ वर्षीय महिलेवर गुंगीचे औषध देऊन बलात्कार केल्याच्या आरोपाखाली त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. बुधवार १८ मार्च रोजी खरात याला पहाटे तीन वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेकडून ताब्यात घेण्यात आले. अशोक खरात हा सिन्नर तालुक्यात मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष आहे. तो मर्चंट नेव्हीतून निवृत्त झाला आहे अशी माहिती प्रसिद्ध झाली आहे.. गेल्या काही वर्षांमध्ये कॉस्मॉलॉजी एक्स्पर्ट आणि अंकशास्त्रज्ञ म्हणून तो नावारुपाला आला. अनेक बडे राजकीय नेते, सेलिब्रिटी आणि उद्योजक त्याच्याकडे मार्गदर्शनासाठी येत असल्याची महिती प्रसिद्ध झाली आहे.. मात्र, त्याला बलात्काराच्या आरोपाखाली अटक करण्यात आल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.अंकशास्त्र आणि धार्मिक विथीच्या माध्यमातून तो महिलांना आपल्याकडे आकर्षित करत होता. वेळप्रसंगी महिलांना धमकावत होता.

मी कृष्णाचा अवतार आहे, तू माझी राधा आहे''...असे म्हणायचा.

महिलेने दाखल केलेल्या एफआयआर मध्ये म्हटलं आहे की, अशोक खरात हा स्वतःला कृष्णाचा अवतार सांगायचा. मी कृष्णाचा अवतार आहे, तू मागच्या जन्मातील माझी राधा होती, असंही तो महिलांना सांगायचा. महिलेच्या डोक्यावर तांब्या-लोटा ठेऊन कॅप्टन खरात कानाजवळ पुटपुटायचा, त्यापूर्वी तो पेढा आणि कडवट - खारट चव असलेलं पाणी प्यायला द्यायचा. महिलांना गायत्री मंत्री म्हणायला लावायचा आणि लागलीच स्पर्श करायला सुरुवात करायचा. महिलेसोबत आलेल्या व्यक्तींना ध्यानस्थ पूजेच्या नावाखाली केबिन बाहेर ठेवायचा. महिलांना गुंगी आली की त्यांचं लैंगिक चाळे करायला सुरूवात करायचा, अशा प्रकारे कॅप्टन अशोक खरात लैंगिक चाळे करुन कॅबीन मध्ये संभोग करायचा. ते फोटोही प्रसिद्ध झाले आहेत. , सध्या लैंगिक शोषणाच्या आरोपात कॅप्टन खरात नाशिक पोलिसांच्या अटकेत आहे. १०० हुन अधिक लैंगिक शोषणाचे सीसीटीव्ही फुटेज असल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्या ऑफिस बॉय सहायकालाही अटक झाली आहे. कॅप्टन खरातकडे अनेक राजकीय, कलाकार, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातील मंडळींचा राबता असायचा तेही समोर आले आहे.अनेक नेतेमंडळींसोबत खरातचे फोटो व्हिडीओ समोर आले आहेत.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर या खरात याच्या मंदिराच्या कार्यकारी सदस्य आहेत. आणि तसेच त्यांचे मंदिराच्या पाटीवर नावही आहे. चाकणकर यांचे अनेक फोटो सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले आहेत. त्यात पायावर डोके ठेवून नमस्कार करताना, केक एकमेकांना खाऊ घालताना, खरात बरोबर शिवपिंडीला अभिषेक करताना, तसेच स्वतःच्या पदराने पाय पुसतांना, असे अनेक फोटो प्रसिद्ध झाले आहेत.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर दमानिया यांनी अत्यंत कडक शब्दांत टीका केली. ''चाकणकर या थर्ड क्लास बाई आहेत. २४ तासांच्या आत राजीनामा दिला नाही, तर महाराष्ट्रातील महिलांनी रस्त्यावर उतरावे,'' असे आवाहन त्यांनी केले. तसेच सुनेत्रा पवार यांनी यात हस्तक्षेप करून चाकणकरांची हकालपट्टी करावी, अशी मागणीही त्यांनी केली. रूपाली चाकणकर यांनी वरिष्ठ पोलीस अधिकार्याचे मदतीने सदर माहिती आणि घटना दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला असाही आरोप सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला आहे.

तसेच भारतीय जनता पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनीही रुपाली चाकणकर यांच्या राजीनामाची मागणी केली होती.सुषमा अंधारे सुध्दा या संदर्भात आक्रमक आहेत. एकूणच प्रकरणाचे गांभीर्य आणि परिस्थिती बघता मुख्यमंत्र्यांनी रुपाली

चाकणकर यांना बोलावून राजीनामा सादर करण्याविषयी सूचित केले, त्याप्रमाणे मी माझ्या वैयक्तिक कारणास्तव माझ्या आयोग पदाचे अध्यक्षाचा राजीनामा देत आहे असे त्यांनी म्हटले आहे. आणि राजीनामा सादर केला आहे. आहेत. राष्ट्रवादी च्या प्रवक्त्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी तर चाकणकर यांना सह आरोपी करुन अटक करावी अशी मागणी केली आहे. त्याचे महिला प्रदेशाध्यक्ष पदही काढून घेण्याची मागणी होत आहे.श

नाना पटोले, भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार यांनीही तिव्र शब्दात संताप व्यक्त केला आहे.

या प्रकरणामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर गुंतागुंत निर्माण झाली आहे आणि त्यातून, राजकीय पाठिंबा, पोलिस अधिकारी यांचा सहभाग खरातची संपत्ती अनेक बाबी समोर येत आहे.नाशिकच्या कॅनडा कॉर्नर सारख्या भागात अनेक दिवसांपासून घडणाऱ्या घटना कोणाच्या लक्षात का आल्या नाहीत.आश्चर्य व्यक्त होत आहे.

आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, लिंगपिसाट अशोक खरातचे पाय धुताना दिसत आहेत, त्याच्यासाठी छत्री धरताना दिसत आहेत आणि त्यांच्या पाया पडताना दिसत आहेत. याच रुपाली चाकणकर राज्यातील मुलींच्या वडिलांना मुलीला सासरी पाठवताना तिच्या हातात पोथी पुराण देण्यापेक्षा संविधान देण्याचा सल्ला दिला होता. सोमवार च्या व्रताची थट्टा केली. स्वतः मात्र शिवलिंगाची खरात बरोबर पूजा अभिषेक करतात.पांडुरंगाची तुलना खरात बरोबर करतात.

वरून किर्तन अन् आतून तमाशा म्हणीप्रमाणे प्रकरण आहे.

खरातचे पाय धुवून पाणी प्यायचे अन् भाषणात लोकांना संविधानाचे सल्ले द्यायचे...कितपत योग्य आहे असा सवाल जनता विचारत आहे.

आध्यात्मिक श्रद्धेपोटी मी खरातवर विश्वास ठेवला होता,आमच्या कुटुंबाने त्याला अध्यात्मिक गुरु मानले होते. त्यामुळे गुरुपौर्णिमेच्या व ईतर कार्यक्रमा निमित्ताने जाणे होत होते.मी मंदिर व्यवस्थापनात सदस्य होते.

पण त्यांची ही दुसरी बाजू मला खरोखरच माहिती नव्हती. जे काही घडले आहे, ते अत्यंत चुकीचे आणि अतिशय निंदनीय कृत्य आहे. आम्ही कुठेही आणि कोणत्याही परिस्थितीत अशा घाणेरड्या कृत्याचे अजिबात समर्थन करणार नाही,'' असे त्या ठामपणे म्हणाल्या.

अशा विकृत आणि वासनांध माणसां विषयी मनात शंका आली नाही का? त्याच्या वागणूकीतून जाणवले नाही का ? एखादा वासनांध विकृत पुरुष आपल्याकडे, व ईतर महिलाकडे कोणत्या नजरेने बघतोय हे स्त्री ला समजण्याचे उपजत ज्ञान असते. चाकणकरांना ते कळले नसावे का ? असे प्रश्नही उपस्थित होतातच.

वासनांध,कामातूर, झालेल्या लोकांना खरंच, ना वयाचे भान राहत ना नात्या गोत्याचे. आणि हीच त्यांची खरी विकृती असते.अशा भोंदू लोकावर कडक कारवाई तर व्हायलाच हवी. त्याबरोबरच त्यांना साथ देणाऱ्या वरही कडक कारवाई होणे आवश्यक आहे.

राज्य महिला आयोग अध्यक्ष या पदावर निवृत्त

आय.पी.एस महिला पोलीस अधिकारी अथवा निवृत्त महिला न्यायाधीश प्रशासनातील आय.पी.एस अधिकारी, बिगर राजकीय चेहरा असणारी महिला अध्यक्ष म्हणून नेमणूक करायला हवी. तेव्हा पीडित महिलांना न्याय मिळेल. राजकीय पार्श्वभूमी असलेली, नेत्यांच्या, पक्षाच्या मर्जीतील महिला नसावी. ह्या गोष्टीवर विचारमंथन होणे आवश्यक आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात...

ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि ह्मणति साधु ।।१।।

अंगी लावूनियां राख । डोळे झांकुनीया करिती पाप ।।२।।

दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ।।३।।

तुका ह्मणे सांगों किती । जळो तयांची संगती ।।४।।

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगाव.**
**८९९९५६६९१७**

# जिल्हा निर्देशांकात जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

## राज्यात प्रथम क्रमांकाने सन्मानित

**जालना । प्रतिनिधी -** दै. लोकसत्ताच्या जिल्हा निर्देशांक या उपक्रमाचे यंदा चौथे वर्ष असून सांख्यिकी विभागाकडे असलेल्या तपशिलाच्या आधारे पुणे येथील विख्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेकडून विविध जिल्ह्याच्या कामगिरीचे विश्लेषण केले गेले. त्यानूसार जालना जिल्ह्याने विविध विकास निर्देशांकाबाबत प्रथम क्रमांक नोंदविला आहे. त्यानूसार जालना जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी करत 'गट-१' मध्ये राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कार्यक्रमाचे आयोजन दि.२० मार्च २०२६ रोजी हॉटेल ताज विवांता मुंबई येथे करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार केला.

विशेषतः प्रशासकीय गतिमानता आणि लोककल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यात जिल्हा प्रशासनाला मोठे यश आले आहे. या लक्षणीय यशाबद्दल जिल्ह्याचा विशेष सन्मान करण्यात आला असून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी हा मानाचा पुरस्कार व सन्मानचिन्ह स्वीकारले आहे. या यशाबद्दल बोलताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, हा बहुमान जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि जिल्ह्यातील जनतेच्या सांघिक प्रयत्नांचे फळ आहे. भविष्यातही जालना जिल्ह्याला विकासाच्या बाबतीत अग्रस्थानी ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जालना जिल्ह्याला मिळालेल्या या गौरवामुळे सर्व स्तरातून प्रशासनाचे कौतुक होत असून मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.




# ६ एप्रिल रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. तरी जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. ६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचित करण्यात येत आहे. लोकशाही दिनात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

# जालना महानगरपालिकेच्या ताफ्यात पाच आधुनिक स्वच्छता वाहनांची भर

## शहर स्वच्छतेला मिळणार नवी गती

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराच्या स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत जालना महानगरपालिकेच्या ताफ्यात ५ नवीन स्वच्छता वाहनांचा समावेश करण्यात आला. 'स्वच्छ भारत अभियान' आणि निधीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या या वाहनांचा लोकार्पण सोहळा आज महानगरपालिका परिसरात उत्साहात पार पडला.



नवीन वाहनांमुळे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक वेगवान आणि कार्यक्षम होणार आहे. ताफ्यात समाविष्ट वाहनांमध्ये: ०३ रोडस्वीपर मशीन मुख्य रस्त्यांची यांत्रिक पद्धतीने जलद साफसफाई २ घंटागाड्या घरगुती कचरा संकलन अधिक नियमित आणि वेळेत. यांत्रिकीकरणामुळे मनुष्यबळावरील ताण कमी होईल आणि स्वच्छतेचा दर्जा अधिक सुधारेल. विशेषतः मुख्य रस्त्यांवर धूळ व कचरा नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल.

**लोकार्पण सोहळा उत्साहात**

या वाहनांचे पूजन व लोकार्पण शहराच्या महापौर वंदना अरुण मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला आयुक्त आशिमा मित्तल यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच भाजप जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, स्थायी समिती सभापती अशोक ऊर्फ लक्ष्मीकांत पांगारकर, आरोग्य व स्वच्छता सभापती कपिल श्रावण भुरेवाल, तसेच महानगरपालिकेचे इतर सभापती, उपसभापती, विरोधी पक्षनेते व सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अंतर्गत उज्जीवन बँकेचे योगदान**

या उपक्रमात खास बाब म्हणजे दोन घंटागाड्या उज्जीवन बँक यांच्या सीएसआर निधीतून महापालिकेला भेट देण्यात आल्या. स्थानिक प्रशासन आणि खाजगी क्षेत्र यांच्यातील सहकार्यामुळे नागरी सुविधा सुधारण्याचा हा उत्तम नमुना मानला जातो.

यावेळी बोलताना महापौर वंदना मगरे म्हणाल्या की, ''नवीन स्वच्छता वाहनांमुळे शहरातील साफसफाई अधिक प्रभावी होईल. नागरिकांना स्वच्छ व निरोगी वातावरण देणे हे आमचे प्राधान्य आहे.'' आरोग्य सभापती कपिल भुरेवाल यांनी नागरिकांनी कचरा घंटागाडी देण्याचे, रस्त्यावर कचरा न टाकण्याचे, स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. जरी नवीन वाहनांची भर पडली असली तरी काही महत्त्वाचे मुद्दे पुढे येतात:, वाहनांची नियमित देखभाल व कार्यक्षम वापर स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, नागरिकांचा सहभाग आणि शिस्त.

फक्त साधनसामग्री वाढवून स्वच्छता सुधारत नाही, तर व्यवस्थापन + जनसहभाग या दोन्हींची आवश्यकता असते.

जालना महानगरपालिकेच्या ताफ्यात समाविष्ट झालेली ही ५ नवीन स्वच्छता वाहने शहरासाठी एक सकारात्मक पाऊल आहे. यामुळे स्वच्छता व्यवस्थापन अधिक सक्षम होण्यास मदत होईल, मात्र त्याचा खरा परिणाम नागरिकांच्या सहकार्यावर आणि प्रशासनाच्या कार्यक्षम अंमलबजावणीवर अवलंबून असेल.

''स्वच्छ जालना, सुंदर जालना'' हे स्वप्न साकार करण्यासाठी प्रशासनासोबत नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे.

### अर्थसंकल्पीय अधिवेशनात मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा मुद्दा गाजला

# तातडीने पंचनामे करुन हेक्टरी एक लाख मदत द्या - आमदार खोतकर

**मुंबई । प्रतिनिधी -** राज्यात सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सभागृहात अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे झालेल्या पिकांच्या मोठ्या नुकसानीकडे शासनाचे लक्ष वेधत तात्काळ पंचनामे आणि भरघोस नुकसानभरपाईची ठाम मागणी केली.



**अवकाळी संकटाने शेतकरी अडचणीत**

गत काही दिवसांत मराठवाड्यात अनेक जिल्ह्यांमध्ये अचानक बदललेल्या हवामानामुळे: उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान, फळबागा व भाजीपाला पिकांचे नुकसान, काढणीला आलेल्या पिकांचे पूर्णतः नुकसान

शेतकऱ्यांसाठी हा काळ अत्यंत संवेदनशील असतो. काढणीच्या टप्प्यावर झालेला हा फटका म्हणजे थेट आर्थिक कंबर मोडणारा ठरतो.

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी प्रश्न उपस्थित करताना स्पष्ट केले की, अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांचे ५० ते १०० टक्के नुकसान झाले आहे. बँक कर्ज, शेती खर्च आणि घरगुती जबाबदाऱ्या यामुळे शेतकरी प्रचंड तणावाखाली आहेत. शासनाने तातडीने हस्तक्षेप करणे अत्यावश्यक आहे. आ. खोतकर यांनी मागणी केली की, तात्काळ पंचनामे पूर्ण करावेत, हेक्टरी किमान १ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, मदत प्रक्रिया जलद आणि पारदर्शक ठेवावी हेक्टरी १ लाखांची मागणी ही सध्याच्या नुकसानाच्या प्रमाणाशी सुसंगत मानली जाते. मात्र, यासाठी मोठ्या आर्थिक तरतुदीची गरज भासणार आहे.

यावर उत्तर देताना राज्याचे कृषिमंत्री यांनी सांगितले, कृषी विभागाला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासन आणि महसूल यंत्रणा यामध्ये समन्वय साधला जात आहे. नियमांनुसार पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जाईल. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते पंचनामे डिजिटल पद्धतीने केल्यास पारदर्शकता वाढेल, विमा योजना आणि सरकारी मदत यामध्ये समन्वय आवश्यक, हवामान बदलामुळे अशा घटना वाढत असल्याने दीर्घकालीन धोरण गरजेचे आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा प्रश्न केवळ स्थानिक नाही, तर राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेशी निगडित आहे. आमदार यांनी हा मुद्दा आक्रमकपणे मांडल्याने शासनावर दबाव वाढला आहे. आता खरी परीक्षा असेल ती पंचनामे किती वेगाने होतात, नुकसानभरपाई कितपत आणि कधी मिळते. कारण, शेतकऱ्यांसाठी दिलासा हा घोषणांमध्ये नाही, तर प्रत्यक्ष मदतीत असतो.

### जिल्हा परिषद जालना अर्थसंकल्प २०२६-२७

# 'शिल्लक' अंदाजपत्रक; नाविन्यपूर्ण योजनांवर २.४३ कोटींची तरतूद






**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद जालनाचा सन २०२५-२६ चा सुधारित आणि २०२६-२७ चा मुळ अर्थसंकल्प आज सादर करण्यात आला. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी हा अर्थसंकल्प सादर करताना आर्थिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवरही संतुलित आणि 'शिल्लक' अंदाजपत्रक मांडल्याचे स्पष्ट केले.

शासनाच्या १४ फेब्रुवारी २०२४ च्या निर्णयानुसार, विविध योजनांचा निधी आता Virtual Personal Deposit (VPD) Account मध्ये जमा केला जाणार आहे.

**अर्थसंकल्पाचा आकार: शिल्लक अंदाजपत्रक**

एकूण अपेक्षित उत्पन्न: ₹२२ कोटी ५५ लाख २० हजार, एकूण खर्च: ₹२२ कोटी ५५ लाख ०७ हजार, म्हणजेच अंदाजपत्रक शिल्लक ठेवण्यात आले आहे महसुलात घट असूनही खर्चावर नियंत्रण ठेवून संतुलन साधण्याचा प्रयत्न दिसतो.

**विभागनिहाय प्राधान्ये वाढीव तरतुद**

पाणीपुरवठा (२०%) ₹३०० लाख, पंचायतराज कार्यक्रम ₹२६८.२४ लाख, शिक्षण विभाग ₹६०.०३ लाख,

**घट झालेली तरतुद**

सार्वजनिक मालमत्ता देखभाल, अनुसूचित जाती-जमाती निधी, दिव्यांग कल्याण निधी (मोठी घट), परिवहन रस्ते (जवळपास शून्य तरतुद)

पाणीपुरवठा व स्थानिक स्वराज्य बळकटीवर भर देताना काही सामाजिक घटकांच्या निधीत कपात दिसतेयावर टीका होण्याची शक्यता.

**महसूल वाढीसाठी नवे मार्ग**

जिल्हा परिषद स्वतःचे उत्पन्न वाढवण्यासाठी विविध उपाययोजना राबवणार आहे यात बांधकाम विभाग सुरू करणे (तत्त्वावर). कार्यालय भाड्याने देणे,

कृषी विभाग, प्रशिक्षण व कार्यशाळा, नोंदणी व प्रमाणपत्र शुल्क, आरोग्य विभागात खाजगी डॉक्टर नोंदणी/नुतनीकरण, १० प्राथमिक आरोग्य केंद्रांवर उपहारगृह अपेक्षित उत्पन्न: ₹१५-२० लाख

शिक्षण विभागात शाळा मैदाने व इमारती भाड्याने, बंद शाळांचे भाडे तत्वावर वापर,

पशुसंवर्धन कुक्कुट हॅचरी, शेळी दूध प्रकल्प, अपेक्षित उत्पन्न: ₹१०-१५ लाख

लघु पाटबंधारे तलावांमध्ये मत्स्य व्यवसायासाठी लिलाव अपेक्षित उत्पन्न: ₹१०-१५ लाख

एकूण अपेक्षित वाढ: ₹९० ते १०० लाख

सरकारी अनुदानावर अवलंबून राहण्याऐवजी 'स्वतःचे उत्पन्न' वाढवण्याची ही महत्त्वाची दिशा आहे.

**२०२६-२७ साठी नाविन्यपूर्ण योजना (₹२.४३ कोटी)**

जिल्हा परिषदेकडून विविध क्षेत्रांत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जाणार आहेत:

विद्यार्थ्यांना ISRO/JNU/IIT येथे शैक्षणिक सहली ₹२५ लाख

आरोग्य १० प्राथमिक आरोग्य केंद्रांचे आधुनिकीकरण ₹१० लाख

दिव्यांग कल्याण ५ प्रकारच्या लाभार्थ्यांना आर्थिक मदत ₹५० लाख

महिला व बालकल्याण अंगणवाडी सेविकांना टॅब, महिलांसाठी कुक्कुटपालन सहाय्य

कृषी ५०% अनुदानावर यंत्र

पशुसंवर्धन आदर्श पशुवैद्यकीय दवाखाना

शेळी दूध व कुक्कुट प्रकल्प

पंचायत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान ₹९० लाख

शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि कृषी या चार प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे.

महसुलात मोठी घट, योजनांच्या अंमलबजावणीत समन्वय, सामाजिक क्षेत्रातील निधी कपात, सकारात्मक बाबी शिल्लक अर्थसंकल्प, नाविन्यपूर्ण योजना स्वतःचे उत्पन्न वाढवण्यावर भर जिल्हा परिषद जालनाचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा आर्थिक मर्यादांमध्ये राहून विकासाचा संतुलित आराखडा आहे.

एकीकडे महसुली घट मोठे आव्हान असले, तरी दुसरीकडे नाविन्यपूर्ण योजना आणि उत्पन्नवाढीचे प्रयत्न आशादायक आहेत.

आता खऱ्या अर्थाने यश ठरणार आहे ते: योजनांची प्रभावी अंमलबजावणी पारदर्शकता आणि समन्वय. कारण अर्थसंकल्प फक्त आकड्यांचा नसतो, तो विकासाचा आरसा असतो.